# न्यू सह्याद्री हौसिंग सोसायटी बजाजनगर येथे पोलिसांच्या सूचनेला मान्यता देवून CCTV कॅमेरे बसवले.

दि.03.09.2017:- आज रोजी पोलीस स्टेशन एम वाळूजचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांनी बजाजनगर मधील न्यू सह्याद्री हौसिंग सोसायटी मधील बसविण्यात आलेल्या CCTV कॅमेरेचे उद्घाटन केले.पोलीस आयुक्त यशस्वी यादव हे शहर पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यावर भर दिला आहे. त्यातूनच शहरात 1500 CCTV कॅमेरे बसविण्याकरिता लोकप्रतिनिधीना आवाहन केल्यामुळे औरंगाबाद शहरामध्ये 1500 CCTV कॅमेरे लावण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त यांनी CCTV चे महत्व पटवून ते लावण्याचे जनतेला आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देवून बजाजनगर मधील न्यू सह्याद्री हौसिंग सोसायटी मधील गणेश उत्सावानिमित्य गोळा केलेल्या वर्गणीतून सोसायटीच्या सुरेक्षेसाठी एकूण आठ उच्चप्रतीचे CCTV कॅमेरे बसवले. त्यामुळे सोसायटीची संपूर्ण सुरक्षा होवून कोणतेही गुन्हे घडण्यास प्रतिबंध बसेल असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक साबळे यांनी केले.या सोसायटीचा आदर्श घेवून इतरही हद्दीतील सोसायटी यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पोलीस स्टेशन MIDC वाळूजच्या वतीने करण्यात आले.